


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३४, रविवार ४ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# नीलेश लंके प्रतिष्ठाणची कार्यकारणी जाहिर

■ तालुका, युवक व विद्यार्थी कार्यकारणीची घोषणा ■ देहू येथील मेळाव्यात नियुक्तीपत्रे प्रदान

**पारनेर : प्रतिनिधी**

**नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या तालुका, युवक व विद्यार्थी संघटनेची कार्यकारणी त्या त्या संघटनांच्या अध्यक्षांनी जाहिर केली असून अलिकडेच देहू येथे पार पडलेल्या प्रतिष्ठाणच्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना आ. नीलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.**

**विविध संघटनांची कार्यकारणी पुढील प्रमाणे**

**नीलेश लंके प्रतिष्ठाण तालुका कार्यकारणी**

बाळासाहेब खिलारी अध्यक्ष, भाउसाहेब भोगाडे सचिव, अभय नांगरे खजिनदार, गणेश तांबे कार्याध्यक्ष, रामदास थोरात, सचिन काळे, नवनाथ मदगे, महेंद्र गायकवाड, राजू रोडे, रविंद्र राजदेव, बाजीराव कारखिले, गणेश मधे, डॉ. उदय बर्वे, संदीप मगर सर्व उपाध्यक्ष, राजू मेंगाळ संघटक, प्रकाश गाजरे टाकळी ढोकेश्वर गटप्रमुख, हरिभाऊ चौधरी कान्हूर गटप्रमुख, विश्वास शेटे निघोज गटप्रमुख, दत्ता कोरडे ढवळपुरी गटप्रमुख, राजेंद्र रोकडे टाकळी ढोकेश्वर गण प्रमुख, सुनील मुळे कर्जुले हर्या गणप्रमुख, संदीप चारूडे सुपा गण प्रमुख, प्रद्युम्न करंजुले वाडेगव्हाण गणप्रमुख, सुनील बाबर, निघोज गणप्रमुख, संतोष खाडे अळकुटी गणप्रमुख, कैलास दिघे कान्हूरपठार गणप्रमुख, नवनाथ रासकर जवळा गण प्रमुख, सुखदेव चितळकर ढवळपुरी गण प्रमुख

**तालुका युवक कार्यकारणी**

प्रसाद अशोकराव नवले अध्यक्ष, अमोल धोंडीभाऊ उगले सचिव, दत्तात्रय साळवे खजीनदार, अनिल शिंदे कार्याध्यक्ष, मंगेश लंके, किशोर रोकडे, दादाभाऊ वाळुंज, अभिजीत झावरे, नवनाथ खामकर, संदीप गुंजाळ, प्रताप जगताप, विकास गिरी, ज्ञानदेव जगताप, सागर पठारे, गोपी पठारे कान्हूर गटप्रमुख, अनिकेत चंद्रकात पवार सुपा गट प्रमुख, बंटी दाते निघोज गट प्रमुख, रमेश केदारी ढवळपुरी गट प्रमुख, युवराज खिलारी टाकळी ढोकेवर गट प्रमुख, गैरव थोरात सुपा गण प्रमुख, तुषार उबाळे वाडेगव्हाण गण प्रमुख, अजित चौधरी कान्हूर गण प्रमुख, अक्षय म्हस्के जवळा गण प्रमुख, विशाल कारखिले निघोज गण प्रमुख, दत्ता येवले अळकुटी गण प्रमुख, प्रदीप भुसारी ढवळपुरी गण प्रमुख, अतुल पवार भाळवणी गण प्रमुख, सागर साळुंके टाकळी ढोकेश्वर गण प्रमुख, सचिन वाफारे कर्जुले हर्या गण प्रमुख, अभिषेक शिंदे, दत्तात्रय शिंदे, नीलेश घोलप युवक संघटक.

**विद्यार्थी प्रतिष्ठाण कार्यकारणी**

शुभम बबन शिरोळे अध्यक्ष, शिाल गागरे उपाध्यक्ष, श्रीलेश मेसे सचिव, शुभम पवार खजिनदार, भावेश म्हस्के निघोज गट प्रमुख, रोहित कामठे अळकुटी गण प्रमुख, साहिल करंजुले सुपा गट प्रमुख, गणेश ढवळे वाडेगव्हाण गण प्रमुख, दत्ता चौधरी ढवळपुरी गण प्रमुख, संकेत किसन ठाणगे टाकळी ढोकेश्वर गण प्रमुख, प्रविण संतोष काळे जवळा गण प्रमुख.



■ देहू येथे पार पडलेल्या नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या मेळाव्यात तालुका, युवक व विद्यार्थी प्रतिष्ठाणच्या पदाधिकाऱ्यांना आ. नीलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

# माजी संचालकांचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला

नगर अर्बन बँक घोटाळा




**नगर : प्रतिनिधी**

**नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणी अटकेत असलेल्या दोन माजी संचालकांचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला आहे. मालमत्तांची माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याने मनेष दशरथ साठे व अनिल चंदुलाल कोठारी या दोघा माजी संचालकांना जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. सहारे यांनी ५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.**

नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणी साठे व कोठारी या दोघा माजी संचालकांना २६ जानेवारी रोजी अटक केली आहे. त्यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी तपासी अधिकारी पोलीस उपाधीक्षक हरीश खेडेकर यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. आरोपी मनेष साठे यांच्या बँक खात्यात सहा लाख रुपये जमा झालेली दिसतात. ही रक्कम त्याने जमीन खरेदीसाठी वापरली आहे. कारवाई टाळण्यासाठी सदरची जमीन त्याने पत्नीच्या नावे केली असल्याचे फॉरेन्सिक ऑडिटमध्ये नमूद आहे.












# रोचक

## शरीर संबंधापेक्षा चुंबन घातक; रोगजंतू पसरतात...



नवी दिल्ली : स्त्री- पुरुषांत शरीर संबंधामुळे काही रोगांचा फैलाव होतो. विशेषत: ज्यांना गुप्तरोग म्हटले जाते असे काही रोग लैंगिक संबंधातून पसरत असतात. त्यात गर्मी, परमा आदी रोगांचाही समावेश असतो. विशेषत: एडस् हा लैंगिक संबंधातूनच पसरतो. रोगांच्या प्रसाराबाबत लैंगिक संबंधाची बदनामी केली जात असली तरी काही तज्ज्ञांच्या मते प्रत्यक्ष शरीर संबंधापेक्षा केवळ चुंबन घेण्याने अधिक रोगजंतूंचा फैलाव होतो. म्हणजे चुंबनाने प्रेम पसरत नसून, रोगकारक विषाणू पसरतात.

सध्या भारतात काही ठिकाणी काही सुधारलेल्या आधुनिक विचाराच्या तरुणांनी जाहीररित्या परस्परांची चुंबने घेण्याची मोहीम सुरू केली आहे. तिला अनेकांचा विरोध आहे आणि त्यामुळे देशभरात वाद निर्माण झालेले आहेत. परंतु ही आधुनिक पुरोगामी मंडळी या जाहीर चुंबनांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मते या चुंबनातून प्रेम पसरते, पण डॉक्टर म्हणतात, दहा सेकंदाच्या चुंबनातून आठ कोटी विषाणूंची देवाणघेवाण होऊ शकते. चुंबनाच्या क्रियेमध्ये जीभ, ओठ, लाळ आणि दात यांचा परस्परांशी संपर्क येतोच. लाळेमधून अनेक प्रकारचे रोगजंतू पसरत असतात. त्यामुळे चुंबनाबाबत सावध रहा, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. चुंबनाच्या क्रियेमध्ये शरीराचे इतर अवयवसुद्धा अलिंगनामुळे जवळ आलेले असतात आणि त्यांना आलेल्या घामातून सुद्धा रोगजंतूंचा प्रसार होऊ शकतो. आपल्या शरीरामध्ये अब्जावधी सूक्ष्म रोगजंतू असतात. त्यांचा प्रसार अशा कृत्यातून होत असतो.

## अरेच्चा कतारमध्ये चक्क निळे रस्ते!

**न्यूयॉर्क : आतापर्यंत तुम्ही रस्त्याचा रंग काळाच असल्याचे पाहिले असेल. मात्र एका देशात रस्त्याचा रंग चक्क निळा आहे. या देशाचे नाव कतार आहे. रस्त्याला निळा रंग देण्याची सुरुवात राजधानी दोहापासून करण्यात आली आहे. हा रंग देण्याचे कारण कतारमध्ये दिवसेंदिवस वाढणारी ग्लोबल वार्मिंगची समस्या आहे.**

तापमान नियंत्रित करण्यासाठी येथील रस्त्यांना निळा रंग देण्यात आला आहे. ग्लोबल वॉर्मिंगला नियंत्रित करण्यासाठी देखील अनेक देश पावले उचलत आहे. कतारने देखील हा प्रयत्न केला आहे.



कतारमध्ये १८ महिने पायलट प्रोजेक्ट चालवण्यात आला. त्यानंतर शहरातील एका प्रमुख रस्त्याला निळा रंग देत कॅम्पेन लाँच करण्यात आले. कतारने परिक्षण केले की, पारंपरिक रंगाच्या जागी निळा रंग दिल्याने तापमानात किती फरक पडतो. यासाठी सेंसर्स देखील लावण्यात आले. वैज्ञानिकांचे म्हणणे आहे की, निळ्या रंगाच्या कोटिंगमुळे सूर्यातून निघणारे रेडिएशन ५० टक्के कमी होतील. यासाठी रस्त्यावर निळ्या रंगाचा एक मिलीमीटर थर चढवण्यात आला. इंजिनिअर साद अल दोसारीने ट्विट केले की, काळ्या रस्त्यांचे तापमान वास्तविक जागेच्या ताप मानापेक्षा २० टक्के अधिक आहे. कारण काळा रंग गर्मी शोषून पुन्हा रेडिएट करतो. आता प्रश्न हा आहे की, कतारमध्ये जर हा प्रयोग यशस्वी झाला तर भारतात ही अशा प्रकारे प्रयोग केला जाऊ शकतो का?

## सहा वर्षीय चिमुकलीने मॉडेल्सना टाकले मागे





लंडन : ६ वर्षांच्या मुलीने मोठमोठ्या मॉडेलला मागे टाकले आहे. प्रत्येक जण तिचा साधेपणा आणि निळ्या डोळ्यांकडे पाहून वेडा होतोय. या मुलीला जगातील सर्वात सुंदर मुलगी म्हटले जात आहे. सोशल मीडियावर या मुलीच्या फोटोंची सध्या चर्चा होत आहे आणि तिचे फॉलोअर्स वाढत आहेत.

रशियातील या लहान मुलीचे नाव अनास्तासिया कोनेजेव्हा आहे. तिच्या साधेपणाची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. निळसर डोळ्याची मुलगी लोकांच्या पसंतीस उतरत आहे. इंस्टाग्रामवर अनास्तासियाच्या फोटोंना खूप पसंती मिळत आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की वयाच्या ६व्या वर्षीच तिचे ८ लाखांपेक्षा फॉलोअर्स आहेत. जेव्हा अनास्तासियाला चार वर्षांची होती, तेव्हा तिची आई ॲना यांनी इंस्टाग्रामवर तिच्या नावाने एक खाते उघडले. ही मुलगी दोन वर्षांत इतकी लोकप्रिय झाली की तिचे फॉलोअर्स वाढत आहेत. ही मुलगी सर्वात मोठा रशियन ब्रँड चोबी किड्ससाठी मॉडेलिंग करते. तिच्या फोटोंवर रोज हजारो कमेंट्स आणि लाईक्स मिळत असतात. बहुतेक लोक टिप्पणीमध्ये तिच्या डोळ्यांची चर्चा करतात.

## सैनिकांच्या गणवेशापासून साकारतो खुर्च्या

लंडन : जगात असे अनेक कसबी कारागीर आहेत ज्यांची कारागिरी पाहून नवलाने बोट तोंडात जाते. ब्रिटनमधील डॉगी स्मिथ याची कारागिरी मात्र फारच वेगळी आणि कौशल्यपूर्ण आहे. स्मिथ खुर्च्या बनवितो. आता असे वाटू शकेल की खुर्च्यात काय विशेष कारागिरी असणार? पण या खुर्च्या खरोखरच अफलातून आहेत. कारण त्या सैनिकांच्या जुन्या गणवेशातून बनविल्या जातात. गेली ३० वर्षे स्मिथ हे काम करतो आहे आणि त्याच्या या खुर्च्या खूपच लोकप्रिय झाल्या आहेत. स्मिथने या खुर्च्यांना आर्मी खुर्ची असेच नाव दिले आहे. स्मिथ ब्रिटनच्या साफ्रोन वाल्डेन येथे राहतो. तो सांगतो, की संपूर्ण ब्रिटनमधून त्याच्याकडे खुर्ची बनवून देण्याची मागणी आहे. त्यातही जे सैनिक शहीद झाले आहेत त्यांचे कुटुंबीय अधिक प्रमाणात आहेत. आपल्या शहीद जिवलगाची आठवण जागी ठेवण्याचा हा एक मार्ग अशी त्यांची भावना त्यामागे असते. तो म्हणतो, नुकतीच त्याने आरएएफ विंग कमांडर फ्लाईट स्क्वाड्रन लीडर्ससाठी अशा ८ खुर्च्या बनवून दिल्या आहेत. स्मिथच्या मते त्याला त्याच्या या कलेचे सर्वाधिक समाधान आणि सन्मान दिला तो बेन पार्किन्सनच्या गणवेशापासून त्याने खुर्ची बनविली तेव्हा. ही खुर्ची त्याने बेनला भेट दिली. तो म्हणतो बेन ब्रिटनचा बहादूर सैनिक आहे. स्मिथ लहानपणापासून हे काम करतो आहे. त्याची ही कारागिरी पाहून लांबलांबून लोक त्याच्याकडे येतात. माझे हे काम लोकांना इतके आवडेल अशी अपेक्षा केली नव्हती, असे स्मिथ सांगतो.






## खाता का बाहुबली डोसा?



भुवनेश्वर : गेले काही दिवस ओरिसाच्या भुवनेश्वरमधील चंद्रशेखरपूर येथील एका रेस्टॉरंट मध्ये बनत असलेला बाहुबली डोसा सोशल मीडियावर चर्चेत असून, या डोसाने रेकॉर्ड बनविला आहे. प्रत्येक रेस्टॉरंट त्यांच्या परीने ग्राहकांना खास आकर्षण वाटावे आणि ग्राहक संख्या वाढावी यासाठी काही खास पदार्थ बनवत असतात. दाक्षिणात्य खाद्यपदार्थात इडली, डोसा हे प्रमुख पदार्थ जगभर लोकप्रिय आहेत. पण ओडीसाच्या बाहुबली डोसा या स्ट्रीट फूड कॅटेगरीत मोडणाऱ्या रेस्टॉरंटने डोसाच पण त्याला एकदम नवीन रुपात पेश केले आहे. हा नेहमीच्या डोस्यासारखा डोसा आहे फक्त याचा आकार भलामोठा आहे. या डोस्याची लांबी ४ फूट असून त्यासोबत बटाटा भाजी, कांदा, सांबर, चटणी दिली जाते. हा डोसा चार जणांना पोटभर होतो. इतके असूनही त्यांची किंमत फक्त ७५ रुपये आहे. दीड वर्षापूर्वी हा डोसा बनविण्याची सुरुवात झाली. मात्र आता तो अधिक प्रकाशात आला आहे. सोशल मीडियावर तो ट्रेंड होतो आहेच पण सर्वाधिक लांबीचा डोसा म्हणून त्याने रेकॉर्ड बनविला आहे.

## टेलरला मिळाली १९ लाखांची नोकरी



नागपूर : गरिबीवर मात करत नागपूरमध्ये शिक्षण घेतलेल्या केरळ मधील मुलाने लाखो रुपयांचे पॅकेज असणारी नोकरी मिळविली आहे. आयआयएम नागपूरमध्ये केरळमधील कोल्लम शहरात राहणाऱ्या जस्टिन फर्नांडिस या मुलाने शिक्षण पूर्ण केले. अतिशय गरिब कुटुंबातून जस्टिन होता. त्याच्याकडे कॉलेजमधील इतर विद्यार्थ्यांप्रमाणे सोयी-सुविधाही नव्हत्या. आपण मिळविलेल्या यशावर जस्टीनचाही विश्वास बसत नाही.

हैदराबाजमधील व्हॅल्यू लॅब या कंपनीमध्ये जस्टीनला असिस्टंट डायरेक्टर पदावर १९ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज असणारी नोकरी मिळाली आहे. आयआयएम नागपूरमधील हा एक रेकॉर्ड आहे. टेलरिंगचे काम जस्टिनचे कुटुंब करते. पण या कामात त्यांना खूप नुकसान सहन करावे लागले. जस्टिनचे आजोबा टेलर होते. वडिलही टेलरिंगचे काम करतात. पण त्यांच्या व्यवसायावर रेडिमेड कपड्यांच्या ट्रेण्डमुळे परिणाम झाला. या कामामुळे घरातील खर्चही निघत नाही, असे जस्टिनने सांगितले. सर्वकाही शिक्षण बदलू शकते, असा विश्वास जस्टिनच्या काकूला होता. त्यामुळे त्याने अभ्यास करण्यात जराही तडजोड केली नाही.

## लग्नात पाऊस नको? मोजा १ लाख पौंड!

बीजिंग : लग्न म्हटले की पाहुणेरावळे, वधू- वर, मस्त मस्त कपडे, दागदागिने, मेजवान्या यांची रेलचेल. पण अशा आनंदाच्या प्रसंगी पाऊस कोसळायला लागला तर वधूवरासह सारेच वऱ्हाडी हिरमुसतात. कारण पावसामुळे लग्नाचा आनंद पुरेपूर उपभोगता येत नाही. इंग्लंडसारख्या देशात जेथे सततच पावसाचा धोका असतो, तेथे तर पाऊस येऊ नये म्हणून वधू- वर नवसही बोलतात असे सांगितले जाते. मात्र देव नवसाला नेहमी पावतोच असे कुठे आहे? पण काळजी करायला नको. तुमच्या लग्नात पाऊस येणार नाही याची हमी ॲलीवर ट्रॅव्हल्स या कंपनीने दिली असून, लग्नात पाऊस कोसळू नये म्हणून ही कंपनी बंदोबस्त करणार आहे. लहानशी अट इतकीच की त्यासाठी तुम्ही कंपनीला १ लाख पौंड मोजायचे आहेत. ते एकदा दिले की तुमच्या विवाहस्थळाच्या ३० किमीच्या परिसरात पाऊस थांबविण्याची जबाबदारी त्यांची. अगदी ढग भरून आले तरी पाऊस पडणार नाही याही हमी कंपनी देते. पाऊस पडण्यासाठी जसे क्लाऊड सिडींग केले जाते तसेच पाऊस न पडण्यासाठीही या तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. चीनमध्ये बिजिंग ऑलिपिक स्पर्धांदरम्यान याच पद्धतीने पाऊस थांबविला गेला होता. ॲलीव्हर कंपनी याच तंत्रज्ञानाचा वापर करते. क्लाऊड सिडींगची प्रक्रिया पूर्ण झाली की ढग कितीही दाटून आले तरी २४ तास पाऊस अथवा बर्फवृष्टी होत नाही, असे सांगितले जाते. कंपनीने सध्या ही सेवा फक्त विमानतळाच्या आसपासच्या ३० किमी अंतरापर्यंतच सुरू केली असल्याचेही सांगितले जात आहे.




## बाहुलीसारखी दिसते म्हणून युवतीला घराबाहेर पडण्यास बंदी!



लंडन : रशिया मधील २६ वर्षीय एन्जेलिका केनोव्हा ही युवती एवढी सुंदर आहे की, घरातच तिला कैदेत ठेवावे लागत आहे. बार्बी डॉलसारखी एन्जेलिका दिसत असल्याने तिला तिचे आई- वडील घराबाहेर निघू देत नाहीत. ती एवढी सुंदर आहे की, लोक तिला एकटक पाहत राहतात. याबाबत एन्जेलिका सांगते की, मला कैदेत ठेवले जाते, असे लोकांना वाटते. पण हे म्हणणे चुकीचे आहे. माझी माझे आई- बाबा खूप जास्त काळजी घेतात. मला कुठेच ते एकटीने जाऊ देत नाहीत. मला बॉयफ्रेंड बनवण्याचीही परवानगी नाही. बार्बी डॉलसारखीच मी घरात राहत असल्याने मला बाहेरच्या जगाचा अनुभव नाही, म्हणून माझ्या पालकांची काळजी योग्यच आहे. पुढे एन्जेलिका म्हणते की, लोक तिची बॉडी पाहून म्हणतात की, तू प्लास्टिक सर्जरी केली आहेस, पण हे खरे नाही. मी आजपर्यंत एकदाही सर्जरी केलेली नाही. एन्जेलिका २६ वर्षांची झाली आहे, पण तिचे कपडे आजही तिची आईच खरेदी करते. त्यांनी सांगितले की, माझे सर्व कपडे बार्बीसारखे आहेत.



## रामासोबत सीता नसलेले असेही मंदिर..!



जोधपूर : राजस्थानातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माऊंट अबू येथे जगातील एकमेव असे राममंदिर आहे जेथे भगवान राम एकटेच विराजमान आहेत. या मंदिराला सर्वेश्वर रघुनाथ मंदिर असे म्हणतात. येथे रामासोबत सीता नाही तसेच बंधू लक्ष्मणसुद्धा नाही. विशेष म्हणजे ही मूर्ती अतिप्राचीन म्हणजे ५५०० वर्षे जुनी आणि स्वयंभू असून अबूच्या प्रसिद्ध नाक्खी लेकमध्ये ती सापडली असे सांगतात. या मूर्तीची मंदिरात स्थापना पहिले जगद्गुरू रामानंदचार्य यांनी केली. वैष्णव समाजाच्या चार सांप्रदायांचे ते मुख्य होते. मंदिरात ही मूर्ती ४०० वर्षांपूर्वी स्थापन केली गेली असल्याचे सांगतात. राम या मंदिरात तपस्वी वेशात आहेत. रामनवमीला येथे मोठी यात्रा भरते. तसेच दरवर्षी मूर्तीची नगरप्रदक्षिणा काढली जाते. या मंदिराच्या आवारात प्राचीन रामकुंड आहे. असे सांगतात की येथे राम आणि लक्ष्मण स्नान करत असत. गुरू वसिष्ठ यांच्या आश्रमात शिक्षणासाठी राम लक्ष्मण राहिले होते, तेव्हा ते या कुंडात स्नान करत असत. रामाचे गुरुकुल याच भागात होते. या कुंडातील जल अतिशय पवित्र मानले जाते. येथे स्नान केल्यास अनेक रोगातून मुक्ती मिळते असा भाविकांचा विश्वास आहे. कुंडातील पाणी कधीही खराब होत नाही त्यामुळे ते पिण्यासाठी वापरले जाते. अनेक भाविक तीर्थ म्हणून हे जल घरी नेतात. अबूचे मूळ नाव अर्बुदांचल. पुराणात या भागाचा उल्लेख अर्बुदारण्य असा होतो. हा दंडकारण्याचा भाग होता, असे सांगतात. याच अरण्यात राम वनवास भोगताना राहिले होते. वसिष्ठ आणि विश्वामित्र या ऋषीमध्ये मतभेद झाले तेव्हा वशिष्ठ येथे राहायला आले आणि येथेच त्यांनी पृथ्वीवरून असुरांचा नाश करण्यासाठी यज्ञ केला होता.

## कॉर्पोरेट नोकरी सोडून अभियंता बनला शेतकरी

चेन्नई : इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगची पदवी. त्याच्या जोडीला एचआरमधील एमबीए. अर्थातच त्याला एका मोठ्या कॉर्पोरेट कंपनीत मोठ्या पदाची नोकरी मिळाली. मात्र चार वर्षांतच कामातील तोचतोचपणा त्याला नकोसा झाला. त्याने नोकरीत ब्रेक घेऊन देश पाहण्याचे ठरविले आणि या भटकंतीने त्याला प्रेरणा दिली पूर्णवेळ शेतकरी बनण्याची! या क्रांतिकारक विचाराला अंमलात आणून त्याने यशस्वी करून दाखविले आणि आता तो सेंद्रीय शेतीचा प्रसार आणि मार्गदर्शनही करतो आहे. त्यामुळे त्याचे शेत हे शेतकरी आणि अभ्यासकांसाठी तीर्थस्थळ बनले आहे.

चेन्नईमधील एका शाळेतील प्राचार्यांचा मुलगा असलेला विनोद कुमार हा सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेला. विद्युत अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनशास्त्राची पदवी घेऊन एका कंपनीत नोकरीला लागला. इमाने इतबारे काम करायचा. कधी कधी कामासाठी दिवस अपुरा पडायचा आणि रात्रही! त्यामुळे मित्रांबरोबर भेटणे नाही की नातेवाईकांकडे जाणे नाही. कामातही काही नावीन्य नाही. त्यामुळे चार वर्षांतच तो आपल्या नोकरीला कंटाळला. तब्बल ४० वर्षे अध्यापनाचे काम करणारे आपले पिता अजूनही त्यांच्या शिकविण्याच्या कामात झोकून कसे देऊ शकतात, असा प्रश्न त्याला पडू लागला. या रुटीनमधून बाहेर पडण्यासाठी त्याने साठविलेल्या पैशातून देशाटन करण्याचा निर्णय घेतला. या प्रवासात त्याच्या निरीक्षणातून त्याला शेतकऱ्यांची वेदना समजली. काहीही करून शेतीमध्ये नफा मिळत नसल्याने आपल्या मुलांनी शेतीचा व्यवसाय करू नये, ही शेतकऱ्यांची प्रातिनिधिक आणि सार्वत्रिक भावना! मात्र काही ठिकाणी पारंपरिक ज्ञानाच्या आधारे काही यशस्वी प्रयोगही त्याला दिसून आले. या देशाटनाने विनोद कुमारच्या आयुष्याला कलाटणी दिली. त्याचे वडील शिक्षक असले तरी चेन्नईपासून ९५ किलोमीटर अंतरावर असलेल्या चेय्युर या गावात त्यांच्या कुटुंबाची वडिलोपार्जित शेती होती. त्याचे वडील हंगामात गावात जाऊन अर्धवेळ शेती करायचे. त्यामुळे मालकीची जमीन होती. पारंपरिक ज्ञानाचे गाठोडे होते. त्याचबरोबर प्रवासात निरीक्षणाने टिपलेल्या अनुभवांची शिदोरी होती. विनोद कुमारने शास्त्रीय पद्धतीने सेंद्रीय शेती करण्यास सुरुवात केली. कमीतकमी खर्चात फायदेशीर शेती करायची असेल तर सेंद्रीय शेतीला पर्याय नाही, हे विनोद कुमारचे ठाम मत आहे आणि अनुभवही! सन २०१४ पासून विनोद कुमार शेती करत आहेत. त्याच्या शेतात ज्वारी, बाजरी, डाळींची पिके आणि तेलबिया पिकतात. या सर्व पिकांना कमीत कमी पाण्याची आवश्यकता असल्याने त्याने या पिकांची निवड केली आहे. शिवाय डाळी आणि तेलबियांना मागणीही चांगली असते आणि दरही चांगला मिळतो. शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारांच्या अनेक योजना आहेत. पण त्यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने शेतकरी त्यापासून वंचित राहतो. हे लक्षात घेऊन विनोद कुमारने सेंद्रीय शेतीच्या प्रसाराबरोबर शेती विषयक योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय देशाच्या विविध भागातील आणि अन्य आशियायी देशांमधील शेती करण्याच्या पारंपारिक ज्ञानाची माहिती घेऊन ती लिखित स्वरूपात संकलित करण्याचे कामही त्याने हाती घेतले आहे.



## शॉर्ट न्यूज

### पत्नी नांदण्यास येत नसल्याने घेतले विष

■ **श्रीगोंदा :** एक महिन्यापूर्वी आंतरजातीय प्रेमविवाह केलेल्या तरुणाने पत्नी नांदण्यास येत नसल्याच्या कारणातून श्रीगोंदा पोलिस ठाण्यात निरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांच्या दालनातच विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विकास थोरात (रा. चोराचीवाडी, ता. श्रीगोंदा) असे त्या युवकाचे नाव आहे. पोलिस कर्मचारी संभाजी गर्ने यांच्या फिर्यादीवरून विकास थोरात तरुणाविरोधात आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपघातातील जखमींना ढाकणेंकडून मदत

■ **शेवगाव :** एका चारचाकी वाहनाने धडक दिल्याने एका वृद्ध महिलेसह जखमी झालेल्या चौघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्याचे काम राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रताप ढाकणे यांनी केले. या घटनेत जखमी झालेल्या कुटुंबीयांनी ढाकणे यांच्या मदतीमुळेच आम्हाला तातडीने उपचार मिळाले असल्याची भावना व्यक्त केली. अपघातामुळे थोरात कुटुंब चांगलेच घाबरले होते. ढाकणे यांनी सर्वांना धीर देत तातडीने घटनास्थळी रुग्णवाहिका बोलावली. रुग्णवाहिका येताच सर्व जखमींना ढाकणे यांनी तातडीने पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवले.

### शिवपुत्र संभाजी महानाट्याची तयारी पूर्ण

■ **संगमनेर :** काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते, माजी महसूलमंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त जाणता राजा मैदानावर ४ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२४ सायंकाळी ६ वा. खा. डॉ अमोल कोल्हे यांचे शिवपुत्र संभाजी हे महानाट्य सर्व नागरिकांसाठी मोफत असून या महानाट्यासाठीची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. स्थानिक २०० कलाकारांसह नाटकाचे रिहर्सल पूर्ण झाले असून सर्व नागरिकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

### खिर्डी तंटामुक्तीचे अध्यक्ष भरत जाधव

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील खिर्डी तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी विखे गटाचे भरत जाधव यांची निवड झाली. सदस्य तात्यासाहेब बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत ही निवड झाली. अध्यक्ष निवडीची सूचना विजय बनसोडे यांनी मांडली. राहुल धायगुडे यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते जाधव यांची निवड झाली. निवडीबद्दल भाजप सरचिटणीस नितीन दिनकर, भाजपा तालुकाध्यक्ष दिपक पटारे यांच्या हस्ते जावध यांचा सत्कार झाला. यावेळी अनिल चितळकर, भगवान चितळकर, भगवान देवकाते, नितीन मासाळ, रघुनाथ राऊत, केशव मतकर आदी उपस्थित होते.

### महसूल विभागात बदल्यांची लगबग सुरू

■ **नगर :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीन वर्षे व पाच वर्षे सेवा झालेल्या महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार आहे. त्यासाठी ८५ बदल्यांचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे. यात जिल्हा महसूल प्रशासनातील १८ उपजिल्हाधिकारी २२ तहसीलदार व ४६ नायब तहसीलदार यांची यादी शासनाला पाठवण्यात आली आहे.मार्च महिन्यात आचारसंहिता लागणार असल्याने महसूल प्रशासनास बदल्यांची लगबग सुरू झाली आहे.

# शिरुरच्या बाजारात कर्नाटकी मिरचीचा ठसका!

## ■ २०० ते २५० रुपये दराने विक्री ■ खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड

**शिरूर : सतीश डोंगरे**



**दररोजच्या जेवणात मिरची आणि मिरचीपूड अत्यावश्यक असते. त्यामुळे नित्य मागणी असते. दरवाढीने सुक्या मिरचीचा ठसका लागत आहे. या पार्श्वभूमीवर कर्नाटक राज्यातून वाळलेली मिरची शिरुर शहरात दाखल झाली आहे. ही मिरची खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडत आहे.**

स्थानिक बाजारपेठेत एक किलो बेडगी मिरचीसाठी जवळपास ५०० ते ६०० रुपये मोजावे लागतात; परंतु कर्नाटकातून आलेली ही मिरची २५० ते ३०० रुपये किलो अन् जास्त खरेदी केल्यावर दर आणखी कमी केले जात आहेत. त्यामुळे खरेदीसाठी ग्राहकांचा ओढा वाढला आहे.

मिरचीच्या भावात कायम चढउतार पाहायला मिळतो. कितीही महाग असली तरी दररोजच्या जेवणासाठी मिरची किंवा मिरचीपूड खरेदी करणे आवश्यकच असते. त्यामुळे हीच मिरची स्थानिक भावापेक्षा स्वस्त मिळत असेल तर ती खरेदी करण्यासाठी गर्दी तर होणारच. असेच चित्र शुक्रवारी (ता. २) शहरात बघायला मिळाले. कर्नाटक, आंध्रप्रदेशात मिरचीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. तिथे भाव कमी मिळतो. त्यामुळे कर्नाटक राज्यातील रायचूर जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी टेम्पोभर मिरची शहरात विकायला आणली आहे.शहरातील सी. टी. बोरा महाविद्यालय रस्त्यावर मिरचीची पोती ठेऊन तेथील शेतकरी विक्री करीत आहेत.

स्थानिक बाजारात सध्या साध्या मिरचीला जवळपास ४०० रुपये किलोचा भाव आहे. परंतु, कर्नाटकातील मिरची केवळ २०० रुपये किलोने विक्री होत आहे. एवढेच नाही तर, पाच किलो मिरची घेणाऱ्या ग्राहकांना ५०० रुपयांत दिली जात आहे. आर्थिक बचत होत असल्याने खरेदीसाठी पसंती दिली जात आहे.

कानडी शेतकऱ्यांना मराठी भाषा जास्त समजत नसल्याने मिरचीबाबत ग्राहकाला इतर चौकशी करता येत नाही. ते केवळ मिरचीचा भाव सांगून 'लय तिखटय' एवढे मात्र ग्राहकांना पटवून देत आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यात मिरचीचे अधिक उत्पादन होते. त्यामुळे त्यांना कमी भावात मिरची विकायला परवडते. सध्या येत असलेली मिरची तीन नंबरची असून, ती जास्त तिखट नाही. स्थानिक दुकानदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही मिरची ओली करून विकली जात असून त्यामुळे वजन जास्त भरत आहे परंतु ग्राहकांना ती स्वस्तात मिळत असल्याचे अमिष दाखविण्यात येत आहे आणि ग्राहक त्याला बळी पडत आहेत. शिवाय या मिरचीला बिल्कुल तिखटपणा नाही.

# प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीचा काढला काटा

## पत्नीसह सात जण जेरबंद



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**प्रेमासाठी चक्क प्रियकर व त्याच्या साथीदारांच्या मदतीने पतीची हत्या घडविण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मृताची पत्नी, तिचा प्रियकर व त्याचे पाच साथीदार अशा सात जणांना अटक केली आहे. आरती योगेश शेळके (वय २६), रोहित साहेबराव लाटे (वय २३, दोघे रा. कोथूळ, ता. श्रीगोंदा), शोएब महमंद बादशाह (वय २२, रा. सेक्टर डी लाईन, ट्रॉम्बे, मुंबई), विराज सतीश गाडे (वय १९, रा. सोलापूर बाजार, कॅम्प, पुणे), आयुष शंभू सिंह (वय १८), पृथ्वीराज अनिल साळवे (वय १९) व अनिश सुरेंद्र धडे (वय १९) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

श्रीगोंदा तालुक्यातील कोथूळ येथे ३० जानेवारीला (मंगळवारी) योगेश सुभाष शेळके हा विवाहीत युवक घरात झोपलेला होता. त्यावेळी त्याच्या घरात अचानक चार व्यक्ती शिरले. त्यांनी योगेशच्या गळ्यावर, हातावर व उजव्या पायावर कोयत्याने वार केले. यात योगेश गंभीर जखमी झाला. योगेशची पत्नी आरतीच्या गळ्याला कोयता लावून आरडाओरड केल्यास जिवे मारण्याची धमकी हल्लेखोरांनी दिली. असे आरती शेळकेने बेलवंडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या हल्ल्यामुळे जखमी योगेशचा मृत्यू झाला. या प्रकरणी बेलवंडी पोलिसांनी खून व दरोड्याचा गुन्हा दाखल करून घेतला.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला होता. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी दोन पथके नियुक्त केली होती. या पथकांनी कोथूळ येथे जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. तसेच परिसरातील व्यक्तींकडून माहिती घेतली. तपास करत असताना पथकाला फिर्यादी आरती शेळकेचा संशय आला. मात्र, पथकाजवळ पुरावा नसल्याने पथकाने इतरत्र तांत्रिक बाबींमधून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. यात मयत योगेश शेळकेचा भाचा शुभम लगड यांच्या मोबाईलवर घटना घडली त्या दिवशी सकाळी रोहित लाटेचा फोन आल्याचे आढळून आले. त्यानुसार पथकाने रोहित लाटे याला पुण्यातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

रोहित लाटेने पथकाला सांगितले की, आरती व त्याचे प्रेम संबंध होते. त्यावरून योगेश शेळकेला या दोघांच्या अनैतिक संबंधावर संशय होता. त्यामुळे तो आरतीला दारू पिऊन मारहाण करत होता. त्यानुसार रोहितने १५ दिवसांपूर्वी नियोजन करून अनिश धाडे याच्या मध्यस्थीने योगेश शेळकेच्या खुनाची दीड लाख रुपयांची सुपारी पृथ्वीराज साळवे, विराज गाडे, शोएब बादशाह व आयुष सिंह यांना दिली, असे त्याने सांगितले. त्यानुसार पथकाने सातही आरोपींना अटक केली. पथकाने आरोपींना पुढील तपासासाठी बेलवंडी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

### दिनेश आहेर यांना ३५ हजारांचे बक्षीस

**राहुरी तालुक्यातील वकील दाम्पत्याचा खून व कोथूळ येथील योगेश शेळके खून प्रकरणाचा वेगवान तपास करत सर्व आरोपी जेरबंद केल्या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांचा विशेष सत्कार केला. यात त्यांनी ३५ हजार रुपयांचे बक्षीस पोलीस निरीक्षक आहेर यांना दिले.**

# १ कोटी ६७ लाखांची फसवणूक; जमीन विकसन करुन देण्याचा केला बहाणा

**पुणे : प्रतिनिधी**



**बाणेर येथील एक जमीन विकसन करताना एका व्यवसायिकाला आर्थिक अडचणी आल्याने त्याने कुणाल हौसिंगचे व्यवसायिक यांना सदर जमीन विकसन करण्यासाठी देण्याबाबतचा करार केला. मात्र, सदर व्यवहारात व्यवसायिकाची एक कोटी ६७ लाख ८२ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी मे.कुणाल हौसिंगचे भागीदार हेंमेंद्र डाहयाभाई शहा, रमेश गिरधरदास शहा व जितेंद्र सुरेश मेहता यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत डेक्कन पोलीस ठाण्यात अनुप विजय मुंदडा (वय-३७,रा.गुलटेकडी,पुणे) यांनी आरोपीविरोधात तक्रार दाखल केली आहे. सदरचा प्रकार ११/१०/२००५ ते ३१/१/२०२४ यादरम्यान घडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचे कॉस्मो डेव्हलर्पस या भागीदारी फर्मने बाणेर येथील विकसनाकरीता घेतलेली जमीन आर्थिक अडचणीमुळे ते विकसित करु शकले नाही. त्यामुळे त्यांनी सदर जमीन हे विकसन करण्यासाठी कुणाल हौसिंगचे सर्व आरोपी भागीदार यांना विश्वासाने निव्वळ विकसित करण्यास दिली. परंतु आरोपींनी फसवणूक करण्याच्या उद्देशाने तक्रारदार यांचा विश्वास संपादन करुन चांगला परतावा देण्याची हमी देऊन दिशाभूल केली. विकसन करारान्वये ठरलेल्या दोन कोटी १४ लाख ४६ हजार रुपये परताव्यापैकी एक कोटी ६७ लाख ८२ हजार रुपये इतकी रक्कम दिली नाही.

तक्रारदार यांनी दिलेल्या कुलमुखत्यार पत्रांचा गैरवापर करुन त्या जमीनीचे स्वत:चे नावे बेकायदेशीररित्या नोंदणीकृत खरेदीखत करुन ७/१२ वर स्वत:च्या नावांची बेकायदेशीररित्या नोंद करुन फसवणूक करण्यात आली आहे. तसेच तक्रारदार यांना आरोपींनी बघून घेण्याची धमकी दिली आहे. याबाबत पुढील तपास डेक्कन पोलिस करत आहेत.

# भाजप आमदार आणि शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यामध्ये राडा

## महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यातच गोळीबार

**उल्हासनगर : प्रतिनिधी**



**उल्हासनगर हिललाईन पोलिस स्टेशनमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या दालनातच कल्याण पूर्व शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री समोर आली आहे. या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे कल्याण पूर्व शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर शुक्रवारी रात्री उल्हासनगरच्या हिललाईन पोलीस ठाण्यात गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी संध्याकाळी अंबरनाथ तालुक्यातील द्वारली गावात आमदार गणपत गायकवाड आणि शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यात जमिनीवरून वाद सुरू होता. हा वाद शुक्रवारी संध्याकाळी उल्हासनगर हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये पोहचला. मात्र काही वेळातच हिललाईन पोलीस स्टेशनच्या आतच या वादात शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाला. त्यामुळे जखमी महेश गायकवाड यांना तात्काळ उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र गायकवाड यांच्यावर नेमका गोळीबार कोणी केला, याबाबत माहिती मिळू शकली नाही.

स्थानिक भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्यासमक्ष हा प्रकार पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या दालनात घडला. यामध्ये महेश गायकवाड गंभीर जखमी झाले असून त्यांच्या पाठीत दोन आणि पायात एक गोळी लागली आहे. त्यांच्यावर सध्या उल्हासनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ठाण्यातील रुग्णालयात दाखल केले आहे.

कल्याण पूर्व शहर प्रमुख महेश गायकवाड आणि भाजप आमदार गणपत गायकवाड हे दोघे हिललाईन पोलीस ठाण्यात आले होते. यावेळी राजकीय वादातून महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. जखमी अवस्थेत महेश गायकवाड यांना तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असून पुढील उपचारासाठी त्यांना ठाण्यातील रुग्णालयात दाखल केले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दरम्यान या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या दालनातच हा प्रकार घडल्यानं चर्चांना उधाण आले आहे. स्थानिक भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्यासमक्ष हा प्रकार घडला आहे. यानंतर कल्याण पूर्वेत पोलिसांचा कडक बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच कल्याण शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्या ऑफिसच्या बाहेर नागरिकांनी गर्दी केली होती.

# लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न जाहीर

## पंतप्रधान मोदी यांची एक्सवर माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



**भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न जाहीर झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे.**

लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, हे सांगताना मला अतिशय आनंद होत असल्याचे मोदींनी ट्विटमध्ये म्हटले आहे. मी अडवाणींशी बोललो असून, हा सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केल्याचे मोदींनी म्हटले आहे.

आपल्या काळातील सर्वात प्रतिष्ठित राजकारण्यांपैकी एक असून भारताच्या विकासातील त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. तळागाळात काम करण्यापासून ते उपपंतप्रधान म्हणून देशाची सेवा करण्यापर्यंत त्यांनी नेतृत्त केल्याचेही मोदींनी ट्विटमध्ये म्हटले आहे.




# नगरमध्ये गांजा विक्रेत्यांवर संक्रांत

## ■ दोन ठिकाणी पोलिसांची कारवाई ■ १३ लाख ३९ हजारांचा गांजा जप्त

**नगर : प्रतिनिधी**

**शाळेच्या संरक्षण भिंती लगत गांजा विक्री करणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी सापळा लावून शिताफीने जेरबंद केले. या दोन्ही आरोपींकडून ७३ हजार रुपये किमतीचा सहा किलो ५६६ ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला.**




कोंडीराम बाबुराव नवले (वय ४२, रा. देवी निमगाव, ता. आष्टी, जि. बीड) व वैभव अनिल घोरपडे (वय १९, रा. बुरुडगल्ली, काळा मारुती मंदिरासमोर, नगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत. तर घरामध्ये विक्रीसाठी ठेवलेला ३४ किलो गांजा तोफखाना पोलिसांनी हस्तगत केला. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी अमोल मदन सदाफुले (वय ३४, रा. मानकर गल्ली, भाजी मार्केट शेजारी, दिल्ली गेट, नगर) याला अटक केले.

कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रवीण दराडे यांना माहिती मिळाली की, क्लेरा ब्रुस शाळेच्या संरक्षण भिंती लगत काही व्यक्ती गांजाची विक्री करत आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक दराडे यांनी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील यांच्यासह एक पथक तयार केले. हे पथक चांद सुलताना शाळेच्या मार्गे क्लेरा ब्रुस शाळेच्या दिशेने निघाले. पथक बंगाल चौकीच्या परिसरात येताच पथकाची विभागणी करण्यात आली. या पथकाने सापळा रचला दोन जण संशयितरित्या वावरत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानुसार पथकाने दोघा संशयितांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याकडे सहा किलो ५६६ ग्रॅम वजनाचा गांजा, ७०० रुपये रोख व दोन मोबाईल आढळून आले. पथकाने हा मुद्देमाल हस्तगत केला. दोन्ही आरोपींच्या विरोधात आमली पदार्थ तस्करीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांना माहिती मिळाली की, भिंगारदिवे मळा येथील एका घरातून गांजा विक्री सुरू आहे. त्यानुसार तोफखाना पोलिसांच्या पथकाने छापा टाकत आरोपीला दाब्यात घेतले. त्याच्याकडून १२ लाख ६३ हजार रुपयांचा ३४ किलो गांजा हस्तगत केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे करत आहेत.

# श्री समर्थ पॉलिटेक्निकची उत्तम यशाची परंपरा कायम

## सिद्धी दरवडे ने पटकविला प्रथम क्रमांकाचा मान



**सुपा : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२३ मध्ये श्री समर्थ पॉलीटेकनिक चा पाचव्या सत्राचा ८६ टक्के निकाल लागला असून डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजीनियरिंग विभागातून द्वितीय वर्षातील सिद्धी दरवडे या विद्यार्थिनीने ८६.६७ टक्के गुण मिळवून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य देसले सर यांनी दिली.**

संस्थेच्या वेगवेगळ्या विभागातून विद्यार्थ्यांनी घवघावित यश संपादन केले आहे .डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजीनियरिंग विभागातून प्रथम वर्षातील पूजा कोहकडे ८१.०६% गुण मिळवून प्रथम आली. द्वितीय वर्षातील सिद्धी दरवडे या विद्यार्थिनीने ८६.६७ टक्के गुण मिळून प्रथम आली. तृतीय वर्षातून वैष्णवी साबळे ८४.३३% मिळून प्रथम आली. डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून प्रथम वर्षातील आठरे बाळू ६९.८८टक्के गुण मिळवून प्रथम ,द्वितीय वर्षातील काळे ओम ७३.७९ टक्के गुण मिळवून प्रथम , व्दितीय वर्षांतील काळे ओम ७३.७९ टक्के गुण मिळवून प्रथम, व तृतीय वर्षातून दर्शन साठे हा विद्यार्थी ७७.७१ टक्के गुण मिळवून प्रथम आला.

तृतीय वर्षातून वैष्णवी साबळे हा विद्यार्थी ८४.३३ टक्के गुण मिळवून प्रथम आला. डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रथम वर्षातून झोडगे शिल्पा ७५टक्के गुण मिळवून प्रथम, द्वितीय वर्षातून गायकवाड आकाश ८० टक्के प्रथम व तृतीय वर्षातील गाडीलकर शुभम ८३.७० टक्के मिळून प्रथम आला आहे डिप्लोमा इन इ एन टी सी इंजिनिअरिंग विभागातून प्रथम वर्षातील तनुजा वैद्य ७९.६५ टक्के म्हणून प्रथम द्वितीय वर्षातील ऋतुजा गाडीलकर ७९.०६ टक्के प्रथम, तृतीय वर्षातील धनश्री खामकर ६४.२१ टक्के गुण मिळून प्रथम आली आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. संस्थेचे संचालक कैलास गाडीलकर यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन

**मी हिवाळी परीक्षा २०२३ मध्ये ८६.६७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम आले आहे, माझ्या मेहनती सोबतच माझ्या शिक्षकांचे मला मोलाचे मार्गदर्शन मिळाले यामुळेच आज मी हे यश मिळवू शकले.**

**सिद्धी दरवडे, विद्यार्थीनी**

# पारनेर पब्लिकमध्ये अमृतकलशासह वृक्षदिंडी

## अमृतवाटीकेत फुलझाडांची लागवड



**मेरी माटी मेरा देश याअभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये अमृतकलशासह वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.**

**पारनेर : प्रतिनिधी**

**मेरी माटी मेरा देश या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील उपक्रमाचे पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत अमृतकलशासह वृक्षदिंडी काढण्यात आली.**

या उपक्रमासंदर्भात संस्थेचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले की, मेरी माटी मेरा देश या अभियानास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. ९ ऑगस्ट २०२३ रोजी प्रारंभ केला. देशातील ७ हजार ५०० गावांमधील माती एक भारत श्रेष्ठ भारत या भावनेतून जमा करून देशासाठी प्राणाची आहूती देणाऱ्या शुर विरांना समर्पित केली. याच धर्तीवर पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या वतीने मेरी माटी दमेरा देश हा उपक्रम आनंददायी वातावरणात साजरा करण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या पार्श्वभुमीवर विद्यार्थ्यांनी विद्यालयात येताना स्वत:बरोबर माती आणली. ही माती अमृतकलशामध्ये जमा करण्यात येउन अमृतकलशासह परिसरातून वृक्ष दिंडी काढण्यात आली. सैनिकांप्रती श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी शाळेतील बागेत अमृत कलशातील माती रिकामी करण्यात येउन इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध फुलझाडांची अमृत वाटिका म्हणून लागवड करण्यात आली.

आपल्या भारत देशाला विकसित देश बनवावा, देशात एकता, बंधुता टिकवून ठेवण्यासाठी सुजाण नागरीकांचे कर्तव्य पार पाडत देशाचे रक्षण करणा-या सैनिकांप्रती आदर निर्माण करा असे आवाहन प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, सचिन मोढवे, दिपक जाधव, प्रशांत साळवे, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पंचप्राण प्रतिज्ञा देउन कार्यक्रमाची सांगता झाली.

### देशाच्या भवितव्याशी जोडण्याचे माध्यम

**मेरी माटी मेरा देश हा केवळ कार्यक्रम नसून देशाच्या भवितव्याशी स्वत:ला जोडण्याचे माध्यम आहे. देशाला महान बनविण्याच्या प्रक्रियेचा हा भाग आहे.**

**गिताराम म्हस्के, प्राचार्य**

# अळकुटी महाविद्यालयास नॅक समितीकडून बी प्लस प्लस श्रेणी प्राप्त

## नॅक मुल्यांकन समितीची पडताळणी




**अळकुटी : प्रतिनिधी**

**अळकुटी महाविद्यालयास बंगलोर येथील नॅक मूल्यांकन समितीने दि.२३ व २४ जानेवारी २०२४ रोजी भेट दिली. यावेळी प्रोफेसर डी. एस. नेगी- चेअरमन, प्र-कुलगुरू एच. एन. बी. गरवाल युनिव्हर्सिटी उत्तराखंड, प्रोफेसर क्षमा अगरवाल-मेंबर कोऑर्डिनेटर, राजस्थान विद्यापीठ, डॉ. रूपरेखा बोर्डोलोई- मेंबर, प्राचार्य- काकोजन कॉलेज, आसाम हे नॅक समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या नॅक समितीने दोन दिवस या महाविद्यालयाची पाहणी व पडताळणी केली.**

नॅक समितीने या भेटीचा अहवाल बंगलोर येथील नॅक कार्यालयास सुपूर्द केला. या अहवालाचे मूल्यमापन करून बंगलोर येथील नॅक समितीने अळकुटी महाविद्यालयास २.७८ सिजीपीए देत बी प्लस प्लस ही श्रेणी बहाल केली आहे. एकूणच संपूर्ण महाराष्ट्रात विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये बी प्लस प्लस श्रेणी मिळविणारे महाविद्यालय म्हणून अळकुटी महाविद्यालयाचा अग्रक्रम लागतो.

अळकुटी महाविद्यालयाच्या मूल्यांकनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास मंत्री मा. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीस शुभेच्छा देत म्हटले की, अळकुटी महाविद्यालयाने शिक्षणाची गंगोत्री तळागाळापर्यंत पोहोचविली आहे व या मूल्यांकनानंतर महाविद्यालयाने उत्तम यश संपादन करत महाविद्यालयच्या शिरपेचात एक मानाचा तुरा निश्चित खोवला आहे. यानिमित्त अहमदनगर जिल्ह्याच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील तसेच अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनीही महाविद्यालयाच्या कामगिरीचे कौतुक करून मनस्वी शुभेच्छा दिल्या.

या मूल्यांकनाप्रसंगी प्रवरा संस्थेचे सेक्रेटरी भारत घोगरे पाटील, मा. पंचायत समिती सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे, निघोज- अळकुटी जिल्हा परिषद गटाचे नेते शसचिन वराळ, पाडळी आळेचे माजी सरपंच श्री. भाऊसाहेब डेरे, श्री.संग्राम पावडे, संस्थेचे सुपरीटेण्डेण्ट डॉ. शिवानंद हिरेमठ सर, डॉ. महेशजी खर्डे- नॅक मेण्टॉर, प्रवरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम पवार, श्री. शेगावकर सर, संस्थेतील विविध विभागांचे पदाधिकारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच या सर्वांनी प्राचार्य डॉ. शरद पारखे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांचे या मूल्यांकनानिमित्त कौतुक केले.

# पारनेरला रविवारी भिमशक्तीचा मेळावा

## माजी मंत्री चंद्रकांत हांडोरे यांचे मार्गदर्शन

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर तालुका भिमशक्ती संघटनेच्या वतीने पारनेर येथे दलित अल्पसंख्याक भटके विमुक्त आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पारनेर येथे भव्य मेळावा रविवार दि.४ रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजीत करण्यात आल्याची माहिती भिमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद शिंदे यांनी दिली.**

या मेळाव्यास भिमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री तसेच काँग्रेसचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष व कायम स्वरुपी काँग्रेसचे केंद्रीय सदस्य चंद्रकांत हांडोरे हे उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.


नगर जिल्ह्यातील व पारनेर तालुक्यातील सर्वांनी सहकार्य करून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद शिंदे ,महासचिव पोपट जाधव, जिल्हा उपाध्यक्ष अंबादास आरोळे ,सरचिटणीस अभिजित शिंदे ,कार्याध्यक्ष गणेश कदम ,संरक्षण प्रमुख जयंत भिंगारदिवे, जिल्हा संघटक अनिल समुद्र ,महिला जिल्हा अध्यक्ष सूनिताताई अवचीते, शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप ,भीमशक्तीचे राज्यसरचिटणीस कर्डक सर ,राज्यसरचिटणीस भाऊसाहेब साठे ,उत्तर जिल्हाअध्यक्ष संदीप मगर ,उत्तर जिल्हा कार्याध्यक्ष विलास जाधव, उत्तर जिल्हा महिला अध्यक्ष शोभाताई पातरे, पारनेर तालुका अध्यक्ष योगेश सोनावणे, नगर तालुका अध्यक्ष सचिन भिंगारदिवे ,कर्जत तालुका अध्यक्ष विलास कांबळे ,पारनेर तालुका उपाध्यक्ष नंदु साळवे, तालुका सचिव रमेश बोरुडे,तालुका सघटक सुरेश विधाटे ,प्रकाश नेटके, बाळासाहेब गायकवाड, संपर्कप्रमुख मयूर मोरे ढवळपुरी शाखा,अध्यक्ष शिवाजी जाधव ,शाम साळवे पानोली, सचिन नगरे आदींनी केलेआहे.

# सार्वजनिक बांधकाम कार्यालयासमोर जागरण गोंधळाचा इशारा

## ■ भाळवणी-पारनेर रस्त्याची दयनीय अवस्था
## ■ भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश संघटनेचा पुढाकार

**भाळवणी : प्रतिनिधी**

**जीवघेणा बनलेल्या भाळवणी ते पारनेर येथील खड्डेमय रस्त्याची वारंवार तक्रार करुन देखील रस्ता होत नसल्याने भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**



भाळवणी ते पारनेरच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, सार्वजनिक बांधकाम विभाग या दुरावस्थेकडे दुर्लक्ष करत आहे. या रस्त्यावर अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात काटेरी जंगल वाढले आहेत. कोट्यावधी रुपयांचा निधी येऊन देखील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती केली जात नसल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

निधीमध्ये अपहार होत असल्यामुळे रस्त्याचे काम रखडले असल्याचा प्रश्न जनतेमध्ये निर्माण झाला आहे. भाळवणी ते पारनेर हा रस्ता पारनेर तालुक्यातील बाजारपेठ व महत्त्वाच्या कार्यालयांना जोडणारा आहे. या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरु न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर २० फेब्रुवारी रोजी जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा इशारा आंबेडकर यांनी दिला आहे. पारनेर मधील २०२२-२३ या आर्थिक वर्षात झालेल्या दुरुस्ती कामाची सखोल चौकशी करुन लेखी खुलासा मिळण्याचीही मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षकअभियंता यांना देण्यात आले आहे. रस्त्याच्या प्रश्नावर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या आंदोलनासाठी ॲड. अरविंद अंबेटकर, अंबादास शिंदे, जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे, महिला जिल्हाध्यक्षा अलकाताई झरेकर, उमेश गायकवाड, प्रेरणाताई धेंडे, अमोल बोरगे, अनिल पठारे, दीपक साळवे, बाबासाहेब डोळस, सनी कांबळे, बाबासाहेब महापुरे, प्रिया जगताप, काशिनाथ पाचंगे आदी प्रयत्नशील आहेत.

# श्रावणी चेमटे कविता लेखन स्पर्धेत प्रथम

**भाळवणी : प्रतिनिधी**

**येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत रयत गुरुकुल प्रकल्पात श्रावणी राजेंद्र चेमटे हिने प्रथम क्रमांक पटकाविला.**



श्रावणी ही इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असून नुकत्याच झालेल्या स्पर्धेत कविता लेखनामध्ये तिने प्रथम क्रमांक मिळविला. भाळवणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र चेमटे यांची ती कन्या आहे. तिच्या या यशाबद्दल महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकरराव कऱ्हाळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीदादा रोहोकले यांनी अभिनंदन केले आहे.

# सैनिक बँकेचे संस्थापक संचालक गंगाराम भनगडे यांचे निधन

## बँकेचे वरिष्ठ अधिकारी संतोष भनगडे यांना पितृशोक

**भाळवणी: प्रतिनिधी**

**सैनिक बँकेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान असणारे पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेचे संस्थापक संचालक गंगाराम भनगडे यांचे आज (शनिवारी) निधन झाले.ते ७५ वर्षांचे होते.**



ज्येष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली १९९५ साली सैनिक बँकेची स्थापना झाली. या स्थापनेत गंगाराम भनगडे यांनी मोलाचे योगदान दिले. ते १९९५ ते २००६ या सालात संस्थापक संचालक म्हणून कार्यरत होते.बँकेच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान होते. श्रीलंकेच्या युद्धात कार्यबजावताना त्यांना बंदुकीची गोळी लागली होती.या धाडसाबद्दल त्यांना पदकही प्राप्त झाले होते. सैनिक बँकेचे वरिष्ठ अधिकारी तथा भाळवणी ग्रामीण पतसंस्थेचे संस्थापक संतोष भनगडे यांचे ते वडील होत.त्यांच्या निधनाने शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### अण्णांबरोबर काम

**पारनेर तालुक्यात सैनिकांची संख्या मोठी आहे. त्यांच्या हितासाठी सैनिक बँक स्थापन करण्याचा निर्णय ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी घेतला. सन १९९५ ला स्थापन झालेल्या सैनिक बँकेचे गंगाराम भनगडे हे संस्थापक संचालक होते. बँकेच्या उभारणीत त्यांनी अण्णांच्या खांद्याला खांदा लावून काम केले.**

### माजी सैनिकांची मानवंदना

**सैन्यातील सेवानिवृत्तीनंतर स्व.गंगाराम भनगडे यांचे माजी सैनिकांसाठी मोठे योगदान राहिले.याचीच कृतज्ञता म्हणून आदर्श सैनिक संघटना व माजी सैनिकांच्या वतीने पार्थिवाला मानवंदना देण्यात आली.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.**

# २७ वर्षानंतर मित्र मैत्रिणी रमल्या गप्पागोष्टीत

## भैरवनाथ विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**पुणेवाडी : प्रतिनिधी**

**२७ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर दहावीच्या माजी विद्यार्थी मित्र मैत्रिणींचा स्नेहमेळावा पुणेवाडी सत्संग भवन येथे मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाला. भैरवनाथ विद्यालय पुणेवाडी या शाळेच्या १९९७ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे तब्बल २७ वर्षानंतर स्नेहमेळाव्यात भेट झाली. दहावी नंतर बरेच मित्र मैत्रीण हे पहिल्यांदाच स्नेहमेळाव्यात भेटले आणि सर्वजण शाळेच्या दिवसामध्ये रममान झाले.**



५३ विद्यार्थ्यांचा पट असलेली ही १९९७ सालची बॅच होती त्यामध्ये ७ मुली आणि ४६ मुलांचा समावेश होता. दहावी नंतर बरेच विद्यार्थी वेगवेगळ्या मार्गाने शिक्षण घेण्यासाठी गेले आणि पुढे माध्यमिक शिक्षण घेऊन झाल्यावर नोकरी, व्यवसाय आणि कुटुंबाच्या जबाबदारी पार पाडत असताना एकमेकांना भेटणं झालं नाही. एकमेकांबरोबर संपर्क कमी झाला परंतु शाळेवर असलेल्या प्रेमाप्रती आणि त्यातून उत्तरदायी होण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे ठरवले. सोशल मीडिया मधील ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांना जोडण्यासाठी एक वॉट्सअप ग्रुप बनवण्यात आला आणि जास्तीत जास्त विद्यार्थी ह्या ग्रुपच्या माध्यमातून जोडण्यात आले आणि सर्वांना एकत्र येण्याची तारीख ठरविण्यात आली ती म्हणजे २७ जानेवारी. यामध्ये विशेष पुढाकार घेतला तो विद्यालयाचे माजी विद्यार्थी राजू चेडे, अशोक शेळके, अशोक रेपाळे, संजू रेपाळे, संतोष शेळके, सुभाष पुजारी, देवराम रेपाळे आणि संदीप पुजारी तसेच मंदा बोरुडे-बुगे या विद्यार्थ्यांनी अतिशय सूत्रबद्ध असे नियोजन करून हा स्नेहमेळावा यशस्वी केला.

स्नेहमेळाव्याचे अध्यक्षस्थान हे विद्यालयाचे माजी.मुख्याध्यापक अशोक गवळी सर यांनी भूषवले. गवळी सरांनी सर्व विद्यार्थांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या आणि निवृत झाल्यानंतरही विद्यालय प्रती प्रेम आणि आस्था या भावना व्यक्त केल्या. सरस्वतीच्या फोटोंचे पूजन करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली, या स्नेहमेळाव्याचे सूत्रसंचालन राजू चेडे यांनी केले.

### आमदारांच्या शुभेच्छा

**आमदार नीलेश लंके यांची विद्यार्थी मित्रांनी भेट घेऊन संबंधित कार्यक्रमाची माहिती दिली आणि आ. लंके यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.**

स्नेहमेळाव्याचे अध्यक्ष निवडीचा प्रस्ताव राजू चेडे यांनी मांडला आणि त्याला सर्व माजी विद्यार्थी यांच्या वतीने अनुमोदन हे अशोक शेळके यांनी दिले. तसेच सर्वांचे विशेष आभार हे संदीप पुजारी यांनी केले.

दरम्यान काही विद्यार्थ्यांची भाषणे झाली आणि सर्वजण शाळेच्या दिवसामध्ये रममाण झाले. संदीप पुजारी, अशोक रेपाळे, अशोक शेळके, गिताराम वाळुंज,नारायण रेपाळे आणि विजय औटी सुभाष पुजारी या विद्यार्थ्यांनी भाषणे करून सर्व विद्यार्थी यांच्या वतीने शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच शिक्षक यांनी जे शिक्षण दिले होते त्या ज्ञानदानाचे आताच्या जीवनात किती महत्व आहे हे भाषणं करत असताना सांगितले. शिक्षकानं मध्ये आमचे वर्ग शिक्षक श्री.आवारी सर,चौधरी सर, गाडेकर सर आणि मिरा पुजारी मॅडम यांनी भाषणे करून शाळेमधील जुन्या आठवणी काढून सर्वांना परत विद्यार्थी दशेत घेऊन गेले आणि नंतर सर्व विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी १९९७ बॅच मधील सर्व माजी विद्यार्थी मित्र मैत्रिणीं यांनी विद्यालयाला काही तरी आर्थिक मदत करावी अशी भावना सर्वांनी व्यक्त केली आणि सर्वांनीच त्याला होकार देत विद्यालयाला काहीतरी सहकार्य करू या अशी भावना व्यक्त केली.

मुलींची संख्या कमी होती तरीही वेळात वेळ काढून नंदा डमरे-खोडदे, कल्पना डमरे-मते, अलका दुष्मान, लता उमाप आणि मंदा बोरुडे-बुगे या माजी विद्यार्थिनी हजर होत्या.विद्यार्थी मित्रांमध्ये वसंत रेपाळे, राजेंद्र रेपाळे,बाबाजी रेपाळे,संदीप पुजारी, जालिंदर बोरुडे,काशिनाथ ठाणगे, विजय औटी, संतोष शेळके,विशाल रेपाळे, बाबाजी डमरे,दत्तात्रय रेपाळे,बहिरू रेपाळे,देवराम रेपाळे, प्रमोद रेपाळे,अशोक शेळके, संदीप पुजारी, अशोक रेपाळे,संजू रेपाळे, सुभाष पुजारी,लाला उमाप, संतोष गायकवाड, प्रकाश पुजारी आदी विद्यार्थी स्नेहमेळाव्याला हजर होते.

दरम्यानच्या काळामध्ये दिवंगत राजेंद्र हारदे सर तसेच माजी विद्यार्थी संतोष रेपाळे यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.सर्वच विद्यार्थी एवढ्या वर्षानंतर भेटले होते आणि भेटल्या नंतर गप्पा गोष्टींच्या ओघात सकाळी १० वाजता जमलेल्या या मित्र परिवाराला दुपारचे ३ कधी वाजले हे समजलेच नाही. यापुढेही असेच एकत्र येऊन एकमेकाचे सुख दुःख जाणून घेऊ या अशी खूणघाट मनाशी बांधूनच शेवटी सर्वांनी एकमेकांच निरोप घेतला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com